**राज्य सरकारच्या महिला कर्मचा-यांना कार्यालयीन वेळेनंतर थांबविणे आणि सुट्टीच्या दिवशी बोलाविणे शक्यतो टाळणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१००८/१७४१/प्र.क्र.१२/०८/१८ (र. व का.),

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ७ मार्च, २००८.

वाचा :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ओएफटी-१०८२/८/अठरा (र.व का.), दि.२२ मार्च, १९८२,

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.शामऊ-१०८७/३४१/२९-अ, दि.३ एप्रिल, १९८७

## परिपत्रक

शासकीय कर्मचाऱ्यांना विशेषतः महिला कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात उशिरा थांबवू नये आणि रविवारी वा सुट्टीच्या दिवशी शक्यतो कामावर बोलावू नये यासंबंधी वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत.

२. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, तातडीचे काम किंवा विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत मंत्रालय विभाग किंवा शासकीय कार्यालयामध्ये महिला कर्मचाऱ्यांना संध्याकाळी कार्यालयीन वेळेनंतर बराच वेळ उशिरा थांबविण्यात येते. तसेच, रविवार किंवा सुट्टीच्या दिवशी महिला कर्मचाऱ्यांना कामावर बोलावण्यात येते. याबाबत वरील आदेशानुसार काढण्यात आलेल्या आदेशांचे एकत्रिकरण करुन सर्व मंत्रालयीन विभागांना पुन्हा सूचित करण्यात येते की, शासकीय महिला कर्मचाऱ्यांना शक्यतो उशिरा थांबवू नये. परंतु, तातडीचे काम किंवा विधिमंडळ अधिवेशन कालावधीत थांबविणे अनिवार्य असल्यास, ज्या महिला कर्मचाऱ्यांना संध्याकाळी ६.३० नंतर उशिरापर्यंत थांबविलेले असेल त्यांना संबंधित विभागाने

(कृ.मा.प...

नजिकच्या रेल्वे स्टेशनवर जबाबदारीने सोडण्याची व्यवस्था करावी. तसेच, रविवार किंवा सुट्टीच्या दिवशी कामावर बोलावणे आवश्यक वाटल्यास विभागाच्या कार्यालय प्रमुखांच्या अनुमतीनेच त्यांना त्या दिवशी कार्यालयात बोलाविण्यात यावे. वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३. सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००८०३१०१२४३०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( चं. भा. म्हात्रे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील असलेल्या सर्व विभागप्रमुख/ कार्यालयप्रमुख यांच्या निदर्शनास आणावे
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
निवड नस्ती